जा.क्र.मनपा/काअ/पापु/३९८ /२०१७
कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद.
दिनांकः- २७.०२.२०१७
२८

| | | | |
|---|---|---|---|
| संदर्भः- | १. | कामाचे नांव | महानगरपालिका औरंगाबाद, झोन क्र.५ अंतर्गत पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती करणे. |
| | २. | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये २४,९४,७७१/- |
| | ३. | निविदा प्रसिध्दी | Tender ID 2016_AMCA_149713_41 Date 03.12.2016 |
| | ४. | सर्वात कमी दराची निविदा | मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% कमीचे देकार |

## परिपत्रक

झोन क्र.५ अंतर्गत वार्ड क्र. ८, ३१ ते ४० आणि ६२ ते ६४ अशा एकुण १४ वार्डांमधील पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल दुरुस्तीच्या कामा करीता महानगरपालिकेमार्फत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. वैधानिक कार्यवाही अंती सदर कामाच्या निविदा उघडल्या असता मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% कमी दराची निविदा प्राप्त झाली.

तथापी संबंधित कंत्राटदाराने दिनांक ०६.१२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर कामासाठी त्यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% जास्त दराची निविदा भरावयाची होती. जी की तांत्रिक किंवा नजरचुकीने १३.१०% कमी दराची लिहिण्यात आली. त्यामुळे सदरील काम हे त्यांना परवडणारे नसल्याने, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% जास्त दराने काम दिल्यास ते काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

कंत्राटदाराने वरील भुमीका घेवून महानगरपालिकेस वेठीस धरले आहे. मुळात मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१०% कमी दराने निविदा सादर करुन, १३.१०% जास्त दराने मंजुर करणे बाबत केलेली मागणी निविदा अटी/शर्तीचा भंग करणारी आहे. प्रत्यक्षात महानगरपालिकेने पारदर्शक पध्दतीने उक्त कामासाठी ई-निविदा पध्दतीचा वापर केलेला आहे. या कारणाने पाणी पुरवठ्या सारख्या संवेदनशिल व प्राधान्य क्षेत्रात करावयाच्या कामासाठी दोन महिन्यांपेक्षा जास्त कालापव्यय होवून नागरीकांना मनःस्ताप सहन करावा लागला आहे व पाण्याचा अपव्यय होवून महानगरपालिकेस देखभाल दुरुस्तीकामी अडचण निर्माण झाली आहे.

संबंधितांचा वैधानिक कार्यवाही अंती निविदा अंतिम झाल्यानंतर सादर केलेला खुलासा नियमा विरुध्द असून ग्राह्य धरता येणार नाही. सबब मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन यांनी निविदेसोबत दाखल केलेली EMD जप्त करुन त्यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येत आहे. करीता मे.शुभांगी कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना महानगरपालिकेचे कोणतेही काम देण्यात येवू नये.

२८-०२-१७

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त**
महानगरपालिका औरंगाबाद.

**प्रत कार्यवाहीस्तव**

1. **सर्व विभाग प्रमुख व शाखा प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद.**
2. **मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.**
3. **मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**
4. **कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, औरंगाबाद.**
5. **कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, औरंगाबाद.**
6. **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद.**
7. **ई-निविदा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद.**
8. **महानगरपालिका संकेत स्थळ**
9. **संबंधीतास**

1.3.2017

EST/15